जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2024
तरुण भारत



कोल्हापूर : राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पन करून अभिवादन करताना मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. कैलास सोनावणे, डॉ. प्रशांत अनभुले, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. उदय पाटील, डॉ. इराण्णा उडचण, डॉ. अमृता मांजरेकर, डॉ. एन.जे. बलेकर, डॉ. पी.बी. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
15 JAN 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अन्न, वस्त्र, निवाऱ्याबरोबरच हवा ही महत्त्वाची'

प्रतिनिधी

कोल्हापूर

अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच आता मूलभूत घटक म्हणून पर्यावरणातील हवा ही महत्वाची आहे. ही हवा अधिकाधिक शुध्द रहावी, यासाठी संघटितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी येथे केले.

जरग नगर येथे भालचंद्र चिकोडे ग्रंथालयात आयोजित 'पुस्तकांवर बोलू काही' या कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, आपल्या पर्यावरणात येणारी झाडे लावावीत, ती कमी पाण्यावर जगणारी, जास्तीचा ऑक्सिजन सोडणारी व कार्बनडाय ऑक्साईड जास्त शोषणारी असावीत. तसेच आपल्या




**कोल्हापूर : जरग नगर येथील कै. भालचंद्र चिकोडे ग्रंथालय येथे कार्यक्रमात बोलताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे . सोबत राहुल चिकोडे उपस्थित होते.**

परिसरात १७ ते १८ किलोमीटर परिसरात जे उगवते ते पीक आपण खावे.

चिकोडे ग्रंथालयाचे अध्यक्ष राहूल चिकोडे म्हणाले, नैराश्याच्या अनेक कारणांपैकी हरवत चाललेला संवाद व दुसऱ्याचे न ऐकणे, एकत्र बसून मनमोकळया गप्पा न मारणे, ही महत्वाची कारणे आहेत. यासाठी हरवत चाललेला संवाद पुन्हा सुरु करणे महत्वाचे आहे.

यावेळी अक्षर दालनचे रवींद्र जोशी, योगेश चिकोडे, मधुरिमा चिकोडे, राम देशपांडे, ॲड. मुकुंदराज मोरे, कमलाकर बुरांडे, चिंतामणी केळकर, रवींद्र अष्टेकर, अनिल चौगुले, अमोल बुद्धे, पापा चव्हाण, राम कांबळे, सचिन साळोखे, जयदीप मोरे, अतुल चव्हाण, कृष्णा आतवाडकर, विजय अग्रवाल, श्रीधर साळोखे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2024
पुण्यनगरी

# 'हवा' हा महत्त्वाचा मुलभूत घटक: डॉ. शिंदे

कोल्हापूर : अन्न, वस्त्र, निवारा यापेक्षा मूलभूत घटक 'हवा' असून त्यासाठी संघटित प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले. भालचंद्र चिकोडे ग्रंथालयात ''पुस्तकांवर बोलू काही'' या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रास्ताविक चिकोडे ग्रंथालयाचे अध्यक्ष राहुल चिकोडे यांनी केले. प्रमुख वक्ते डॉ. शिंदे यांनी त्यांच्या जीवन प्रवासात ते पर्यावरणाकडे कसे वळले हे सांगताना वणवा पाहण्यासाठी त्यांनी लावलेली आग व त्या आगीमुळेच पुढे सूक्ष्म निरीक्षणातून निसर्गाकडे वळलो व झाडे लावण्याचा छंद लागल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन योगेश चिकोडे, मधुरिमा चिकोडे, सचिन साळोखे, जयदीप मोरे, अतुल चव्हाण, कृष्णा आतवाडकर, विजय अग्रवाल, श्रीधर साळोखे आदींनी केले. या कार्यक्रमाला अक्षर दालनचे रवींद्र जोशी राम देशपांडे, ॲड. मुकुंदराज मोरे, राम कांबळे या निसर्गप्रेमींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2024
लोकमत

# राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कैलास सोनावणे, डॉ. प्रशांत अनभुले, डॉ. पी.डी. पाटील, डॉ. उदय पाटील, डॉ. इराण्णा उचडण, डॉ. अमृता मांजरेकर, डॉ. एन. जे. वलेकर, डॉ. पी. बी. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 JAN 2024

पुढारी

# रिक्त जागांच्या प्रवेशासाठी आता 'स्कूल कनेक्ट' अभियान

## विद्यापीठे, महाविद्यालयात आजपासून प्रारंभ; उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा उपक्रम

कोल्हापूर : प्रवीण मस्के

राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रम प्रथम वर्षाचे प्रवेश वाढविण्यासाठी बारावी विद्यार्थ्यांसाठी 'स्कूल कनेक्ट' अभियान राबविले जाणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीतील पुढचे पाऊल म्हणून उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे सोमवारपासून राज्यभर उपक्रमाची सुरुवात होणार आहे.

उच्च शिक्षण विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू केली आहे. विद्यापीठ, महाविद्यालयात पदवी प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २० टक्के घटली आहे. महाविद्यालयांमध्ये क्षमतेपेक्षा खूप कमी प्रवेश झाल्याने अडचणीचे ठरत आहे. उच्च शिक्षण विभागाकडून ग्रॉस एन्रोलमेंट रेशो (जीईआर) वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पदवी प्रथम वर्षाला विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी विद्यापीठांकडून १२ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी १५ ते ३१ जानेवारी दरम्यान हे संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणातील विद्यार्थिकेंद्री बदल, विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन, बहुविद्याशाखीय लवचीक अभ्यासक्रमांविषयी माहिती, व्यावसायिक आणि कौशल्याधारित संशोधनाविषयी माहिती दिली जाणार आहे. यासंदर्भात विद्यापीठ आणि महाविद्यालय स्तरावर कार्यशाळा घेण्यात येणार आहेत.

> "
> उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्यावतीने सोमवारपासून स्कूल कनेक्ट उपक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांची कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन केले जाईल. 'जीईआर' २७ टक्केपासून ते ५० टक्केपर्यंत नेण्यासाठी टप्प्याटप्प्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रतिकूल परिस्थितीमुळे शिक्षण न घेता आलेल्या, ड्रॉपआऊट झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न आहे.
>
> - डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ




### विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस टूरचे आयोजन...

विद्यापीठात कायमस्वरूपी यंत्रणा विकसित केली जाणार आहे. प्र-कुलगुरूंच्या अध्यक्षतेखालील समिती असणार आहे. समितीच्या माध्यमातून अभियान राबवून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणाची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण राबविणाऱ्या स्वायत्त महाविद्यालयांची विद्यार्थ्यांना कॅम्पस टूर घडवून आणली जाईल.

जनसंपर्क कक्ष
15 JAN 2024
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सत्यदूत

# शिवाजी विद्यापीठ उपकेंद्रासाठी समितीकडून जागेची पाहणी

सत्यदूत । वृत्तसंस्था

● खानापूर : शिवाजी विद्यापीठाच्या खानापूर येथे होणाऱ्या उपकेंद्राच्या जागेची पहाणी मंगळवारी उपकेंद्राबाबत नेमलेल्या समितीने केली. यावेळी समितीने खानापूर येथे प्रत्यक्ष जाऊन उपलब्ध राष्ट्रीय महामार्गालगतची जागा, पाण्याची व्यवस्था, दळणवळण सुविधा यासह विविध गोष्टींचा विचार करून ही जागा उपकेंद्रासाठी योग्य असल्याचे मत नमूद केले. यावेळी अभिसभा सदस्य माजी नगराध्यक्ष वैभव पाटील व सौ. मेघाताई गुळवणी यांनी खानापूर येथे टेंभू योजनेच्या जुन्या बंद असलेल्या इमारतीत जूनपासून विद्यापीठ उपकेंद्राचे काम तात्पुरत्या स्वरूपात सुरू करावे, अशी मागणी केली.



शिवाजी विद्यापीठाच्या सांगली जिल्ह्यातील उपकेंद्राबाबत नेमलेल्या समितीने खानापूर येथे प्रत्यक्ष हजर राहून जागेची पाहणी केली.

खानापूर येथे विद्यापीठाचे उपकेंद्र होण्याबाबत अधिसभा सदस्यांच्या बैठकीत प्रस्ताव मंजुर करण्यात आला होता. त्यापार्श्वभूमीवर उपकेंद्राबाबत नेमलेल्या समितीचे सदस्य आज, सकाळी खानापूरात दाखल झाले. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन शिंदे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुहास शिंदे यांच्यासह शिवसेनेचे दादा भगत यांनी समितीचे स्वागत केले. त्यानंतर समितीने उपलब्ध असलेल्या तेथील जागेची पहाणी केली. पाण्याची व्यवस्था, दळणवळण, महामार्गालगतची जागा याची पहाणी करून ही जागा उपकेंद्रसाठी योग्य असल्याचे सांगितले.

त्यानुसार समितीचा अहवाल विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर दि. १५ जानेवारीपर्यंत ठेऊन त्याची मान्यता घेऊन सिनेट, उपकेंद्र समितर व्यवस्थापन परिषदेचा एकत्रित अहवाल राज्य शासनाकडे सादर करून उपकेंद्र सुरू करण्याबाबत कार्यवाही होणार असल्याची माहिती सिनेट सदस्य ॲड. वैभव पाटील यांनी दिली.

दरम्यान, खानापूरच्या टेंभू कार्यालयातील वापरात नसलेल्या इमारतीची पहाणीही यावेळी समितीने केली. ● पान ४ वर

## विद्यापीठ उपकेंद्रासाठी समितीकडून जागेची पाहणी

उपकेंद्र सुरू करताना सुरूवातीच्या काळात तेथील इमारत वापरणे संबंधीचा प्रस्ताव शासनास देऊन येत्या जूनपासून हे उपकेंद्र खानापूर येथे सुरू करण्यासाठी समिती प्रयत्नशील राहील, अशी माहिती शिवाजी विद्यापीठा अभिसभा सदस्य ॲड. वैभव पाटील यांनी दिली. या समितीत प्राचार्या डॉ. मेघाताई गुळवणी, डॉ. रघुनाथ डमकले, ॲड. स्वागत परूळेकर, ॲड. वैभव पाटील, श्रीमती काव्याश्री नलवडे, संजय परमणे, विशाल गायकवाड, डॉ. प्रशांत खरात सहभागी झाले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JAN 2024
सकाळ

# वास्तूंच्या संवर्धनासाठी लोकांची मानसिकता सकारात्मक असावी



डॉ. नीलांबरी जगताप

पुरातत्त्व खात्याकडे मनुष्यबळ व निधी कमी आहे. या खात्याचे वार्षिक बजेट ४० कोटी रुपयांचे असते. सर्व जिल्ह्यांना समान न्याय देऊन, निधीचे वाटप केले जाते. मुळात वास्तूंच्या संवर्धनासाठी लोकांची सकारात्मक मानसिकता असणे आवश्यक आहे. जेथे लोकांचा पाठिंबा मिळतो, तेथे संवर्धनाचे काम अधिक गतीने होते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणून औसा व उदगीरकडे पाहता येईल. आर्किटेक्ट व कार्पोरेटस् यांच्या सहयोगातून वास्तूंचे संवर्धन करता येणे शक्य आहे. महापालिकेने निधी उभा केला, तर वास्तूंची माहिती सर्व घटकांपर्यंत पोचवणे शक्य आहे. चांगल्या कामात अडथळा आणण्याच्या प्रवृत्तीचा मात्र बिमोड झाला पाहिजे. आपल्याकडे टेक्नॉलॉजी व टेक्निकल माणसांची कमतरता नाही. केवळ नकारात्मक मानसिकतेमुळे अनेक कामे प्रलंबित आहेत.

**- डॉ. निलांबरी जगताप, शिवाजी विद्यापीठ**

- लोक चळवळीतून वास्तूंचे महत्त्व कळेल.
- हेरिटेज कमिटीची स्थापना व्हावी.
- नागरिकांत वास्तूंबद्दल जनजागृती झाली पाहिजे.
- विद्यापीठस्तरीय तज्ज्ञांना घेऊन कामे व्हावीत.

जनसंपर्क कक्ष

15 JAN 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महावीर'ला नमवून कॉमर्स कॉलेज अजिंक्य

## विद्यापीठ झोनल क्रिकेट स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ झोनल क्रिकेट पुरुष स्पर्धेमध्ये डी. आर. के. कॉमर्स कॉलेज, कोल्हापूरच्या संघाने अजिंक्यपद पटकाविले. देवचंद महाविद्यालय अर्जुननगर येथे हा सामना खेळविण्यात आला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेतील विजेता कॉमर्स कॉलेजचा संघ.

प्रथम फलंदाजी करताना कॉमर्स कॉलेज संघाने १३९ धावांचे लक्ष महावीर महाविद्यालयाच्या संघासमोर ठेवले. महावीरचा संघ केवळ ८० धावा करू शकला. हा सामना 'कॉमर्स'ने ५९ धावांनी जिकला. विजयी संघातील खेळाडू

क्षितिज पाटील (कर्णधार), सुरज कोंढाळकर, रणजीत निकम, वैभव पाटील, शुभम वाडकर, आदित्य बराले, प्रथम सावनुर, सुधांशु रसाळ, सुमित कदम, आदित्य पिसाळ, श्रेयस चव्हाण, निरंजन इंगवले, रोहन लोंढे, आदित्य भोसले, आदित्य जोशी, दर्शन निंबाळकर, नीलकुवर कदम विजयी संघास कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, संचालक ॲड. वैभव पेडणेकर, ॲड. अमित बाडकर यांचे प्रोत्साहन तर प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, जिमखाना चेअरमन के. जी. कांबळे, शारीरिक शिक्षण संचालक प्रकुल पाटील-मांगोरे यांचे मार्गदर्शन लाभले.